MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

## भाजप सह महायुतीला मोठा झटका शिवसंग्रामच्या नेत्या ज्योती मेटेचा शरद पवारांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश



बीड /प्रतिनिधी

शिवसंग्राम नेत्यां ज्योतीताई मेटेनी शिवसंग्राम पदाची स्वर्गीय विनायकरावजी मेटे यांच्या निधनानंतर धुरा यशस्वी सांभाळत असताना आता त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटात जाहीर प्रवेश केला यावेळी सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ चे संपादकाशी दूरध्वनीवरून शिवसंग्राम चे नेते कोलंगडे आप्पानी बोलताना आपली प्रतिक्रिया दिली आहे की शिवसंग्राम ज्योतीताई मेटे ह्या बीड विधानसभेतील उमेदवार असू शकतात. ज्योतीताई मेटेना शरद पवारांनी उमेदवारी दिली किंवा शरद पवार साहेब बीड विधानसभेमध्ये जो उमेदवार देतील त्या उमेदवारांचं कामंशिवसंग्राम चा सर्व परिवार सदस्य कार्यकर्ते हे जाहीर रित्या काम करतील विनायक रावजी मेटे साहेब यांच्या नेतृत्वाखाली शिवसंग्राम संघटना चालत होती परंतु या पहिल्याच पंचवार्षिकला आता ज्योतीताई मेटेनी धुरा सांभाळली आहे. ज्योती मेटेना बीड विधानसभेतून उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. परंतु शरद पवार जो उमेदवार देतील त्या उमेदवाराचा आम्ही काम करू असाही शब्द शरद पवार ज्योतीताई मेटे यांनी शरद पवारांना दिल्याची माहिती समोर येत आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ अंक -३३ | रविवार दि.२० ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -33 | SUNDAY DT.20 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

☆सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ व महाराष्ट्र आरंभ लाईव्ह न्यूजचा अंदाज अचुक☆

# राजेंद्र मस्केची हकालपट्टी होण्याअगोदरच भाजप जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा?

**लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडेचा पराभव हा मराठा समाजाच्या जातीवादामुळं झाला असा जावई शोध लावणाऱ्या राजेंद्र मस्केचा राजीनामा? विनायक मेटे यांच्या पाठीत खंजीर खुपसल्यानंतर आता पंकजा मुंडे यांच्या पाठीत खंजीर खुपसत राजेंद्र मस्केची मराठा समाजाकडे धाव? मराठ्यांच्या पाठीत खंजीर खुपसणे राजेंद्र मस्केला शक्य नाही आता समाज जागा झाला आहे? राजेंद्र मस्के ची हकालपट्टी होणार होती हे त्याना माहीत असल्यामुळेच राजीनामा देली ही भाजपच्या गोटामध्ये चर्चा? . मनोज दादा जरांगे पाटील सांगतील तीच पूर्व दिशा आता मराठा समाजामध्ये ठरली आहे दिशा! मराठा समाजाच्या अनेक भाजप पदाधिकारी लोकांना राजेंद्र मस्केचा त्रास होता का? बीड विधानसभा डोळ्यासमोर ठेवून राजेंद्र मस्के यांनी अपक्ष लढत मराठ्यांच्या मतासाठी राजीनामा दिला अशी चर्चा? राजेंद्र मस्के च्या राजीनाम्या मुळे बीड जिल्हा भाजपमध्ये आनंदच! बीड जिल्हा भाजपमध्ये राजेंद्र मस्के ला का थांबायचे नाही! राजेंद्र मस्के म्हणजे लबाडाच्या घरचं अवतान जेवल्याशिवाय खरं नाही? पंकजाताई मुंडे यांचा राजेंद्र मस्के ठरला फुसका बार? भाजपचा जिल्हाध्यक्ष हकालपट्टी होण्याचा अगोदर राजेंद्र मस्केची सावध भूमिका! राजेंद्र मस्केला बीड जिल्हा भाजपकडून मोठा विरोध कायम होताच?**

बीड लोकसभा 2024 मध्ये पंकजाताई मुंडे यांचा सहा हजार मतांनी पराभव झाला या 6000 मताला राजेंद्र मस्के हे जबाबदार आहेत. कारण बीड जिल्हाध्यक्ष म्हणून मराठा समाजाचे अठरापगड जातीमध्ये वावरत असताना अनेक कार्यकर्त्यांना राजेंद्र मस्के यांनी राजकीय द्वेषाने त्रास दिला आणि पंकजाताई मुंडे यांनी त्यांना जवळ केले परंतु राजेंद्र मस्के हे म्हणाले होती की मराठ्यांच्या जातीय वादामुळे पंकजाताई मुंडे यांचा पराभव झाला असा जावई शोध राजेंद्र मस्के यांनी लावला होता परंतु राजेंद्र मस्के यांनी जर असा शोध लावला होता तर मग आता पंकजाताई नका सोडलं याचे उत्तर जनतेला राजेंद्र मस्के ने द्यावे की मराठा जातीवादी होते का राजेंद्र मस्के यांनी स्वतःच काम का केले नव्हते याचे उत्तर राजेंद्र मस्के यांनी द्यावे अशी जनतेकडून मागणी होत आहे



बीड /प्रतिनिधी

बीड भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के बंडखोरीच्या तयारीत असल्याची बातमी सायं दैनिक महाराष्ट्र आरंभच्या गेल्या अनेक दिवसांपासून अंकात प्रसिद्ध करत आहोत. हे वृत्त खरे ठरले असून राजेंद्र मस्केंनी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. यामुळे सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ व महाराष्ट्र आरंभ लाईव्ह न्यूज चैनल ने खरी हकिगत या अगोदर ठरला आहे.

पंकजा मुंडे यांचे कट्टर समर्थक भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केनी आपल्या पदाचा आज दिनांक २० ऑक्टोबर रविवार रोजी राजीनामा देत असल्याची घोषणा केली आहे. राजेंद्र मस्के यांनी अचानक जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याने बीडच्या राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

प्रत्येकवेळी निवडणुकीच्या वेळी होत असलेल्या अन्यायामुळे हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे. भाजपचा राजीनामा देऊन आता पुढे कोणत्या

मी भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदांचा राजीनामा देऊन भारतीय जनता पार्टीचा त्याग करत आहे.दुसऱ्या पक्षात जाणार किंवा अपक्ष बीड. विधानसभा लढवणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राजेंद्र मस्के यांची भारतीय जनता पार्टीतून हकालपट्टी होण्याच्या अगोदर राजीनामा दिल्यामुळे थोडी तरी इज्जत वाचली आहेत अशी चर्चा सध्या बीड जिल्ह्यात भाजपमध्ये ऐकायला मिळत आहे. राजेंद्र मस्केच्या कार्यकाळामध्ये अनेक भाजप अधिकाऱ्यांना होत होता त्रास छोट्या छोट्या गुत्तेदारीचे अनेक कामाच्या बाबतीमध्ये राजेंद्र मस्के कडून त्रास होत होता.

### राजेंद्र मस्के ने भाजपमध्ये असताना अनेक भाजप पदाधिकाऱ्यांना त्रास दिला!

बीड जिल्हा भाजपचे जिल्हाधिक राजेंद्र मस्के यांनी भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष जर आपल्या हातात घेतल्यानंतर अनेक भाजपाचे पंकजाताई मुंडे समर्थक बाजूला गेले राजेंद्र मस्के यांनी स्वतःची राजकीय पोळी भाजून घेत असताना आर्थिक पोळी भाजून घेतली यावेळी मात्र आता राजेंद्र मस्के मी स्वतःच्या पदाची पक्षातून हकालपट्टी होण्याच्या

**बीड आमगार कैसा हो राजेंद्र मस्के जैसा हो अशा घोषणा देणाऱ्या चे काय? राजेंद्र मस्के यांनी एका धार्मिक कार्यक्रमांमध्ये बालाघाटावरील कार्यक्रम मध्ये तत्कालीन पालकमंत्री व श्री आमदार यांच्या स्टेजवर म्हणजेच विनायक मेटे पंकजा मुंडे यांच्या समोर बीड का आमदार कैसा हो राजेंद्र मस्के जैसा हो अश्या घोषणा दिल्या होत्या या घोषणा देत असताना राजेंद्र मस्के यांनी स्वर्गीय विनायक रावजी मेटे साहेब यांच्या पाठीत खंजीर खुपसले पंकजा मुंडेंकडे प्रवेश केला व आता पंकजा मुंडे यांच्या पाठीत खंजीर खुपसले फक्त आता पुन्हा एकदा मराठा समाजाच्या पाठीत खंजीर खुपसत भाजपा जिल्हाध्यक्ष राजीनामा केला आहे**

# मी विधानसभा निवडणूक लढणार आणि लढणारच, हे अंतिम सत्य- अनिलदादा जगताप

## दि. २२ पासून अनिलदादा जगताप यांच्या प्रचार दौऱ्याला प्रारंभ; बीड मतदार संघातील कुटुंबियांच्या घेणार भेटी!



**प्रतिनिधी** । बीड

विधानसभा निवडणुकांच्या रनधुमाळी सुरु झाल्या आहेत. बीड मतदार संघात सध्या अनिलदादा जगताप यांना मोठया प्रमाणात पसंती देण्यात येत असून अनिलदादा यांच्या प्रचार दौऱ्याची उत्सुकता शिगेला पोहचली असल्याचे दिसून येत आहे. अनिलदादा जगताप यांचे समर्थक, सहकारी, कार्यकर्ते देखील मोठ्या उत्साहात प्रचार दौऱ्याचे नियोजन करून आहेत. अनेक वर्षांपासून जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र तत्पर असणाऱ्या अनिलदादांना दादा तुम्ही आमदार व्हा, अशी आर्तहाक बीडकर देत आहेत. याच आर्तहाकेला ओ देऊन अनिलदादा जगताप महाराष्ट्राची धाकटी पांढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायण गडाचे दर्शन घेऊन आपल्या प्रचार दौऱ्याचा आरंभ करत आहेत. येत्या मंगळवारी दि. २२ रोजी सकाळी श्री नगद नारायणाचे आशीर्वाद घेऊन अनिलदादा जगताप नवगण राजुरी सर्कलमधील सर्व गावांना भेटी देणार आहेत. यानंतर दुसऱ्या सत्रात बीड शहरातील काही प्रभागातील कुटुंबियांच्या भेटी घेणार आहेत. शिवसेना पक्ष जी भूमिका घ्यायची ती भूमिका घेईल. मात्र अनिलदादा यांच्या झंजावताला येणाऱ्या २२ तारखेपासून सुरुवात होत आहे. अनिलदादा जगताप यांनी यापूर्वीही अनेकदा पत्रकार परिषदेत मी विधानसभा निवडणूक लढवणारच आहे, अशी भूमिका स्पष्ट केली होती. पक्षाची भूमिका कोणतीही असो मात्र बीडकरांच्या हितासाठी आणि बीडच्या विकासाचा कायापालट करण्याकरिता कार्यकर्ते आणि जनतेच्या आग्रहास्तव निवडणूक लढणार आहेत व यासाठीचेच पाहिले पाऊल म्हणजे अनिलदादा जगताप आपल्या प्रचार दौऱ्याचा आरंभ नारायण गडापासून करत आहेत. गेल्या सदोतीस वर्षांच्या राजकीय प्रवासात अनिलदादांनी शिवसेना आणि बाळासाहेबांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिलेले आहेत व आजही हेच विचार घेऊन अनिलदादा जगताप आपला प्रचार दौरा सुरु करत आहेत. बीड मतदार संघात सध्या अनिलदादा जगताप यांना सर्वोपरी पोषक वातावरण तयार झालेले आहे. आजवर विधानसभा निवडणुकीत अनेकांना संधी दिली. मात्र यावेळी अनिलदादांना संधी देऊ असा सुर बीड मतदार संघात चांगलाच उमठला आहे. अशा परिस्थितीत अनिलदादा जगताप यांच्या प्रचार दौऱ्याला होत असलेला प्रारंभ विजयाची नांदी ठरणारा असणार आहे.

बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार; जनता आणि कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी निवडणुक लढवणार- अनिलदादा जगताप

वर्षानुवर्षे बीडची जागा शिवसेनेची आहे आणि ती शिवसेनेलाच सुटणार आहे. काहीजण या जागेवर अतिक्रमण करत असले तरी ही जागा शिवसेनेची आहे आणि ती शिवसेनेकडेच राहणार यात तिळमात्र शंका नाही. जनता आणि कार्यकर्ते यांच्या आग्रह आणि प्रबळ असणारी इच्छा लक्षात घेऊन मी निवडणूक कुठल्याही परिस्थितीत लढणार असल्याचे अनिलदादा जगताप यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हंटले आहे.

# कुणाला गुलाल लावायचा आणि कुणाला बुक्का हे ठेवीदारच ठरवणार -प्रा.सचिन उबाळे

## बीडमध्ये ठेवीदारांची लवकरच निर्णायक बैठक

**प्रतिनिधी** । बीड

बीड जिल्ह्यातील लाखो ठेवीदारांच्या पैसा खिशात घालणार्या मल्टीस्टेट वाल्यांविरोधात गेल्या नऊ महिन्यापासून सर्वसामान्य ठेवीदार आंदोलन करत असताना त्यांच्या आंदोलनाबद्दल एक चकार शब्दही न काढणार्या आमदार,मंत्री व प्रस्थापित पुढार्यांना विधानसभा निवडणूकीत पराभवाचा बुक्का लावण्यासाठी ठेवीदार संघर्ष समिती सज्ज झाली असल्याचा दणदणीत इशारा ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन भैय्या उबाळे यांनी दिला आहे.

प्रा.सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार दि.१९ ऑक्टोबर रोजी ठेवीदारांनी पोलीस उपअधिक्षक विश्वांभर गोल्डे यांची भेट घेवून करोडो रुपयांचा घोटाळा करणार्या मल्टीस्टेट वाल्यांविरुध्द पोलीस प्रशासनाकडून नवीन कारवाई कधी होणार, फरार आरोपींना अटक कधी होणार या संबंधी विचारणा केली असता श्री.गोल्डे म्हणाले की येत्या आठवड्यात आम्ही ज्ञानराधाच्या अर्चना कुटे, राजस्थानी मल्टीस्टेटचे चंदुलाल बियाणी, ज्ञानराधाचा संचालक बबन खरसाडे, लक्ष्मीमाता अर्बनचा परमेश्वर राठोड, साईरामच्या चेअरमन सौ.परभणे आदि फरार आरोपींना अटक करणार असल्याचे सांगितले.

यानंतर माध्यमांशी बोलतांना मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन उबाळे म्हणाले की, हजारो ठेवीदारांना गंडा घालणार्या या मल्टीस्टेट वाल्यांविरोधात पोलीस प्रशासनाने एमपीआयडीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या मार्फत गृह विभागाला त्वरीत पाठवावा. या लोकांच्या संपत्तीवर टाच आणावी अशी मागणी आपण पोलीस प्रशासनाकडे केली आहे. सर्वसामान्यांना ठेवी परत मिळाव्यात या मागणीसाठी गेल्या नऊ महिन्यापासून आम्ही आंदोलन करत आहोत. बीड जिल्ह्यातील एकही राजकिय पुढारी आमच्या आंदोलनाबद्दल किंवा ठेवीदारांच्या बाजूने बोलायला तयार नाही. सर्वसामान्यांचे पुढार्यांना काहीही पडले नसून ते निवडणूकीच्या रंगात रंगून गेले आहेत. मात्र आता आम्ही ठेवीदारांनी येत्या निवडणूकीत त्यांना घरी



पाठवण्याचा निर्णय घेतला असून या संबंधी लवकरच बीडमध्ये ठेवीदारांची निर्णायक बैठक घेणार असल्याचे प्रा.उबाळे यांनी जाहिर केले.

# योगेश, सतिश पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश

**प्रतिनिधी** । जातेगांव

जातेगाव येथील जातेगाव तांडा, खोरी तांडा, खोपटी तांडा, जांभळी तांडा येथील गोर सेना जिल्हा उपप्रमुख सतीश पवार, गोर सेना तालुका अध्यक्ष योगेश पवार, बाळासाहेब अच्युत पवार, अंकुश मोहन राठोड, शंकर चव्हाण, साहेबराव पवार, विजय राठोड, राजू राठोड, मोहन काशिनाथ राठोड, रमेश राठोड, अशोक राठोड, परमेश्वर राठोड, अभिजीत पवार, अजय पवार, सुनील पवार, विनोद राठोड आदींसह असंख्य गोर सेना पदाधिकाऱ्यांनी शनिवार दि.१९ रोजी माजी आमदार तथा राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित आणि जि.प.चे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास

ठेवून कृष्णाई येथे अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर



प्रवेश केला.अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे राष्ट्रवादीत स्वागत केले. यावेळी माजी जि.प. सदस्य साहेबराव पांढरे, माजी पं.स.सदस्य विलासराव चव्हाण, राष्ट्रवादी जिल्हा संघटक भागवतराव आरबड, से.सो.चेअरमन शंकरराव पवार, कल्याण चव्हाण, दत्ताभाऊ वाघमारे, भागवतराव धोंडरे, यादवराव सराटे, राधेश्याम लेंडाळ, विजयसिंह यमगर, राधेश्याम धोंडरे, बाबुराव राठोड, रामेश्वर पवार, रामेश्वर चव्हाण, अंकुश राठोड, गणेश पवार, सोहेल शेख आदींसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# पहाडीपारगाव चे निराधार योजना समिती सदस्य बंडुभाऊ मस्के याचे उत्कृष्ट कार्या बद्दल सपत्नीक गौरव

**प्रतिनिधी** । किल्ले धारूर

तालूक्यातील पहाडी पारगाव येथील माजी सरपंच व सध्या तालुकानिराधार योजना समीतीचे सदस्य बंडूभाऊ मस्के यांनि शासनाचे विवीध योजनाचा लाभ गावातील वंचित ग्रामस्थाना मिळवून दिल्या मुळे त्याचा सपत्नीक सत्कार करून गौरव करण्यात आला. त्यांते कार्याचे कौतूक करण्यात आले.

धारूर तालुक्यातील श्रावण बाळ निराधार योजनेतून पहाडी पारगाव गावातील शेकडो लोकांना वैयक्तीक समिती सदस्य झाल्या वर लाभ मिळवून देणारे गावचे ज्येष्ठ नेते तथा माजी सरपंच व संजय गांधी निराधार समितीचे धारूर तालुका सदस्य बंडूभाऊ मस्के यांच्यामुळे भोगलवाडी जिल्हा परिषद गटातून आता पर्यंत हजारो लोकांना या योजनेचा लाभ मिळवून दिला. तरी बंडूभाऊ मस्के यांच्या माध्यमातून लाभ मिळाला आहे इथून पुढेही त्यांच्या हातून अशीच लोकांची सेवा घडो यासाठी ग्रामपंचायत पहाडी पारगाव च्या वतीने त्यांचा जिल्हा परिषद शाळा पहाडी पारगाव येथे जाहीर सत्काराचे आयोजन केले आहे. त्याचा त्याची पत्नी कस्तूराबाई बंडु मस्के यांच्या सह सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्याचे कार्याचा गौरव करण्यात आला यावेळी सरपंच बालासाहेब अंडील, उपसंरपंच हनूमंत मुंडे उत्तमराव ढगे मंच्छिद्र पुर्णे नवनाथ ईरमले उध्दव रुद्रे, अभिमान ढगेआदी सह ग्रामस्त मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# शेतकऱ्यांच्या व्यथा विधानसभेत मांडण्यासाठी खराट्याला मते द्या.भाई ड नारायण गोले पाटील

**प्रतिनिधी** । तालखेड

गेल्या दहा वर्षात शेतकरी प्रचंड व्यतीत झाला असून शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या हमीभावासह दैनंदिन महागाई, बि- बियाण्यांच्या वाढत्या किमती, खते औषधे यांच्यात येणारी वाढती भेसळ, आणि साखर कारखानदाराकडून होणारी शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी म्हणजेच शेतकऱ्यांच्या व्यथा विधानसभेत मांडण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या खटाऱ्याला मते देण्याचे आवाहन भाई ड नारायण गोले पाटील यांनी सुरुमगाव, गुंजथडी, पिंपरी खुर्द, खतगव्हाण येथे कॉर्नर सभेत बोलताना केले.

कृषीप्रधान देशात शेतकरी दुर्लक्षित असून गेल्या ७० वर्षात शेतकऱ्याच्या शेतमालाला कीफायातशिर हमीभाव देणारा कायदा राज्यात आणि केंद्रात शासन करू शकलेले नाही याशिवाय शेतकऱ्यांच्या शेतमालाला लागणारे बी - बियाणे, खते, औषधे, वीज व इतर उपयुक्त साधने यांच्या किमती दिवसेंदिवस भरमसाठ वाढत असताना गेल्या साठ वर्षात काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजप, शिवसेनेसह सर्वच प्रस्थापित पक्ष आणि प्रस्थापित राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना व सामान्य नागरिकांना लुटण्याचे पाप केले असून या प्रस्थापित राजकीय पक्षांना आणि प्रस्थापित राजकीय पुढार्यांना धडा शिकवण्याची वेळ आलेली असून शेतकऱ्यांसाठी, कामगारासाठी,कष्टकऱ्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून सातत्याने आक्रमकपणे आणि प्रामाणिकपणे लढणारा शेतकरी कामगार पक्षाचा लालबावटा आजही त्याच उमेदीने शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढतो आहे, शेतकरी कामगार पक्षांचा आवाज बुलंद करण्यासाठी व भाई एन डी पाटील, भाई गणपतराव देशमुख,क्रांतीसिंह नाना पाटील,या महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या चळवळी जिवंत ठेवण्यासाठी तसेच माजलगाव मतदारसंघातल्या प्रस्थापित राजकीय पुढार्यांची गुंडागर्दी, प्रशासनाकडून शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवण्यासाठी शेतकऱ्यांच्या व्यथा विधानसभेत मांडण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचा खटारा एक मताने निवडून द्या असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे माजलगाव विधानसभेचे उमेदवार भाई ड नारायण गोले पाटील यांनी सुरमगाव, गुंजथडी, पिंपरी खुर्द, खतगव्हाण येथे कॉर्नर सभेत बोलताना केले, यावेळी व्यासपीठावर भाई मुंजा पांचाळ,भाई भास्कर कांबळे, भाई श्रीराम शेवाळे, राजेभाऊ घोडके, संभाजी चव्हाण यांची उपस्थिती होती तर सुरुमगाव, गुंजथडी, पिंपरी खुर्द, खतगव्हाण येथील गावकरी प्रचंड संख्येने उपस्थित होते, भाई ॲड नारायण गोले पाटील यांना जनतेतून प्रचंड प्रतिसाद मिळताना दिसत आहे.



शेतकऱ्याची शेतमालाला हमीभाव मिळवण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचा खटारा विधानसभेत पाठवून, माजलगाव मतदार संघात गेल्या पाच वर्षात शेतकऱ्या सह नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यात अपयशी ठरणाऱ्या आणि जनतेशी,जनतेच्या मताशी गद्दारी करणाऱ्यांना माजलगाव विधानसभा निवडणुकीत धडा शिकवा असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे विधानसभेचे उमेदवार भाई ड नारायण गोले पाटील यांनी सरवर पिंपळगाव, सोमठाणा,अडोळा येथे प्रचार दौऱ्यात बोलताना केले.

गतवेळी विधानसभा निवडणुकीत माजलगाव मतदार संघातील शेतकरी, कष्टकरी, अल्पसंख्यांक, दलित,मुस्लिम समाजाने पुरोगामी विचाराचे उमेदवार म्हणून ज्यांना मते दिली त्याच लोकांनी जनतेच्या मताशी गद्दारी करत पहाटे शपथविधीला उपस्थिती दर्शवली तसेच अजित पवार यांच्यासह भाजपसोबत घरोबा करून पुरोगामी विचाराशी आणि जनतेच्या मताशी गद्दारी केली याशिवाय पाच वर्षात तालुक्यात माजलगाव मतदार संघात शेतकऱ्यांसह, कामगारांच्या, तरुणांच्या, विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर उदासीनता दाखवत शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या भाजपला बळ दिले त्यामुळे जनतेशी गद्दारी करणाऱ्यांना या निवडणुकीत त्यांची जागा दाखवा याशिवाय जाती-जातीत भांडणे लावणाऱ्या आणि महागाई वाढवुन देशोधडीला लावणाऱ्या व शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव न देणाऱ्या, मराठा समाजा सह धनगर समाजाला आरक्षण नाकारणाऱ्या सरकारला घरचा रस्ता दाखवण्यासाठी शेतकऱ्याच्या कुटुंबातील कार्यकर्ता म्हणून शेतकरी कामगार पक्षाच्या खटारा चिन्हावर मत देऊन विजयी करण्याचे आवाहन भाई ड नारायण गोले पाटील यांनी केले यावेळी भाई मुंजा पांचाळ, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई राहुल सोळंके, भाई श्रीराम शेवाळे, जनार्दन कुदळे, भाई भास्कर कांबळे, यांच्यासह सरवर पिंपळगाव, सोमठाणा, अडोळा शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

# सैनिक-माजी सैनिक कुटुंबीय संरक्षण समिती सदस्यपदी निवृत्त सुभेदार हाजी सय्यद इस्माईल

**प्रतिनिधी** । किल्ले धारूर

गृह विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या आदेशान्वये बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या वतीने नुकतीच जिल्हास्तरीय सैनिक व माजी सैनिक कुटुंबीय संरक्षण समिती गठीत करण्यात आली. या समितीच्या सदस्यपदी धारुर येथील निवृत्त सुभेदार हाजी सय्यद इस्माईल यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत करुन अभिनंदन होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, देशाच्या सीमेवर हिमालय पर्वतासारखे भक्कम उभे राहून भारत देश व सर्व भारतीयांना सुरक्षीत ठेवण्यासाठी जिवाची बाजी लावणाऱ्या सैनिक व माजी सैनिक यांच्या कुटुंबीयांना येणाऱ्या विविध अडी अडचणी सोडविण्यासाठी गृह विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या आदेशान्वये बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या वतीने नुकतीच बीड जिल्हास्तरीय सैनिक व माजी सैनिक कुटुंबीय संरक्षण समिती गठीत करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ हे असणार आहेत. या समितीच्या सदस्यपदी धारुर येथील निवृत्त सुभेदार हाजी सय्यद इस्माईल यांच्यासह बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक अशा इतर अकरा माजी सैनिकांची या



समितीत निवड करण्यात आली आहे. हाजी सय्यद इस्माईल यांच्या निवडीबद्दल माजी सैनिक संघटनेसह सर्वस्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# कोतवाल झाले महसूल सेवक

**प्रतिनिधी** । धारूर

महसूल वीभागातील गाव पातळीवरील कोतवाल कर्मचाऱ्यांचे मागील महिन्यांत चतुर्थ श्रेणी आणि इतर मागण्या मान्य करण्यासाठी आंदोलन सुरू होते. याचाच एक भाग म्हणून मुंबई येथे आझाद मैदानात आंदोलन झालेले होते त्याचप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्र काम बंद आंदोलन होते. याची फलश्रुती म्हणून शासनाने चतुर्थ श्रेणीची मूळ मागणी सोडून इतर काही मागण्या मान्य केले आहेत. त्यातच पदनाम बदल ही मागणी मान्य केली आहे.

आता तलाठी कार्यालयात तलाठ्यांना सहकार्य करणारे कोतवाल कर्मचारी हे महसूल सेवक म्हणून ओळखले जातील तसा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केला आहे. महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेने चतुर्थ श्रेणी चा दर्जा देणे, पदनाम बदलणे, विविध शासकीय भरतीमध्ये आरक्षण इत्यादी मागण्या ठेवलेल्या होत्या त्यापैकी पदनाम बदलण्याची मागणी शासनाने मंजूर केली आहे. यात नवीन पदनाम सहाय्यक ग्राम महसूल अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी सहाय्यक आणि महसूल सेवक असे पर्याय देण्यात आली होते. त्यापैकी महसूल सेवक या पदनामा मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आणि तसा शासन निर्णय सोमवारी प्रसिद्ध करण्यात आला, झालेल्या निर्णयाचे संघटनेने स्वागत केले असून, मूळ मागणी सुद्धा याच प्रमाणे तात्काळ मान्य करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

कालानुरूप पदनाम बदलणे अत्यंत आवश्यक होते आणि यासाठी कोणताही निधी शासनाला लागणार नाही असे आम्ही संघटनेच्या वतीने शासनाला निवेदन देऊन पटवून दिले होते, आता पदनामात बदल केल्याने या पदाची ओळख सुद्धा निश्चितपणे बदलेल असा विश्वास मिळाला आहे.ज्योतिबा तिबोले (महसूल सेवक )


महसूल वीभागातील गाव पातळीवरील कोतवाल कर्मचाऱ्यांचे मागील महिन्यांत चतुर्थ श्रेणी आणि इतर मागण्या मान्य करण्यासाठी आंदोलन सुरू होते. याचाच एक भाग म्हणून मुंबई येथे आझाद मैदानात आंदोलन झालेले होते

# परळी तालुक्यातील लोणी येथील असंख्य युवक कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात

## राजेभाऊ फड यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश

**प्रतिनिधी** । परळी

परळी तालुक्यातील लोणी येथील शेकडो असंख्य युवक कार्यकर्त्यांचा युवक नेते राजेभाऊ फड यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश करण्यात आला. राजेभाऊ फड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रुमाल व प्रवेश केलेल्या सर्वांच्या गळ्यात रुमाल व स्वागत करून आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या सेलचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष. गणेश देवकते यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी प्रवेश केला लोणी येथील युवा कार्यकर्ते भागवत काचगुंडे यांचे राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या युक्त असेल परळी वैजनाथ तालुका. सचिव पदी. निवड करण्यात आली आहे. श्री राजाभाऊ फड यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले . दे ऊन निवड करण्यात आली. परळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. शरदचंद्र पवार .पक्षाचे युवा नेते राजेभाऊ कडू यांचे विधानसभा संपर्क कार्यालयात परळी तालुक्यातील लोणी येथील असंख्य युवक कार्यकर्त्यांनी यांनी युवा नेते राजेभाऊ फड. यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस. शरदचंद्र पवार. पक्षाचे केलेले प्रवेश केला युवा नेते. राजूभाऊ फड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये श्री. प्रभाकर काचगुंडे धम्म केदारे प्रल्हाद सोनवणे बंटी सोनवणे कृष्णा देवकते अमोल देवकते तुकाराम काजगुंडे गणेशराव देवकते भागवत काच गोंडे भगवान मंजू सुदाम केदारे पिंकल देवकते संदीपान देवकते अभिजीत काजगुंड. असंख्य कार्यकर्ते व गावातील गावकरी मंडळी यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व युवकांचा प्रवेश राष्ट्रवादी काँग्रेस .शरद चंद्र पवार. पक्षात प्रवेश झाला. आदरणीय खासदार . शरदचंद्रजी पवार साहेब . उत्तुंग व्यक्तिमत्व आहेत . त्यांच्या विचाराने व कार्याने प्रभावित होऊन अनेक



युवक पक्षांमध्ये प्रवेश करीत आहेत. त्या सर्वांचे मनपूर्वक स्वागत करतो अनेक पदाधिकारी व तरुण सहकार्यांचा पक्षप्रवेशाने परळी विधानसभा मतदारसंघात पक्ष संघटना नक्कीच बळकट होईल व राष्ट्रवादीची ताकद देखील वाढणार आहे त्या दृष्टीने सर्वांनीच पक्षाचे ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहोचण्याचा काम एक झुटीने करायचे आहे असे आव्हान युवा नेते. राजेभाऊ फड. यांनी केले दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी .शरद चंद्र पवार. पक्षाचे प्रदेश अध्यक्ष .आ .जयंत पाटील . जिल्हाध्य आमदार . संदीप भैया शिरसागर. यांच्या सूचनेनुसार परळी वैजनाथ. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट. यांच्या परळी वैजनाथ तालुका. सचिव पदी लोणी येथील युवा नेतृत्व भागवत काच गुंडे यांचे नियुक्ती करण्यात आली आहे .राजेभाऊ फड. यांच्या हस्ते दोन्ही नियुक्तीपत्र देण्यात आले आदरणीय .खासदार. शरदचंद्रजी पवार . यांच्या विचारनुसार पुढील काळात पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या विकासात आपण भरीव कार्य कराल व पक्ष संघटना अधिक मजबुतीने उभी कराल ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे या निवडीच्या सर्व स्तरातून अभिनंदन होता आहे यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस .शरदचंद्र पवार पक्षाचे शहर अध्यक्ष जिवंतराव देशमुख. भटक्या सेलचे परळी तालुका अध्यक्ष .गणेश देवकते . ज्यांनी लोकसभेच्या मतदानादिवशी बोगस मतदान होऊ नाही दिलेले असे श्री मुक्ताराम गवळी आधी उपस्थित होते राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार. गटाचे उमेदवार. संभाव्य यादी मध्ये नाव असलेले परळीचे राजेभाऊ फड . यांना उमेदवारी फिक्स झाल्याचे दिसून येत आहे तरी कार्यकर्त्यांना त्यांनी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या किसन सेलच्या जिल्हाध्यक्ष पदी नागेश मिठे पाटील यांची निवड

**प्रतिनिधी । बीड**



राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) यांच्या किसन सेल जिल्हाध्यक्ष पदी नागेश मीठे पाटील यांची निवड करण्यात आली हि निवड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशध्यक्ष जयंतराव पाटील व बीडचे नूतन खासदार यांच्या आदेशाने किसन सेल प्रदेश अध्यक्ष पुजाताई मोरे यांनी निवड केली आहे. नागेश मिठे पाटील यांनी वारंवार समाज प्रश्नासाठी काम केले सर्व सर्वसामान्य नागरिकांना प्रश्नासाठी पाठपुरावा केला पुढील काळात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पाठपुरावा करून शेतकरी प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नागेश मिठे पाटील व्यक्त केले

# गेवराई येथील मोमीनपुरा भागातील मुस्लिम समाजाच्या कब्रस्थानला नगर परिषदेचे नाव!

## या भागातील नागरिकांमध्ये असंतोष पसरला ; तात्काळ नाव काढण्याची मागणी




**प्रतिनिधी । गेवराई**

गेवराई : येथील मोमीन पुरा भागात जुने कब्रस्थान आहे सदर कब्रस्थान पूर्ण तालुक्यात मुस्लिम कब्रस्थान मोमीन पुरा या नावाने परिचित आहे. जर कोणाची मयत झाली तर मस्जिदमध्ये पण याच नावाने उल्लेख करून धर्मगुरू नमाजाचे आवाहन करतात. काही महिन्यापूर्वी येथील सत्ताधारीने या कब्रस्थान मध्ये नगरपरिषद च्या योजनेमध्ये शेड रोड व वजूखाना यासाठी निधी उपलब्ध करून दिली होती. सदर काम झाल्यानंतर प्रवेशद्वारा वर मुस्लिम कब्रस्थान मोमीनपुरा असा उल्लेख करण्यात आले परंतु त्याखाली नगरपरिषद गेवराई असे नावही टाकण्यात आले आहे. ते कायदेशीर आहे कारण या कब्रस्थानचा आणि नगरपरिषद चा काहीही संबंध येत नाही. कारण ही कब्रस्थानची जागा वक्फ अंतर येते. या भागातील नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे. सदर नाव काढण्यात यावे अशी मागणी या भागातील नागरिकांकडून केली जात आहे. जर नाव काढण्यात आले नाही तर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे.

# माजलगाव येथे शिवसेना (शिंदे गट)ला धक्का,उपतालुकाध्यक्ष निलेश कांबळे यांचा एमआयएम पक्षात जाहीर प्रवेश

## बीड जिल्हाध्यक्ष अँड शफीकभाऊ यांनी केलं स्वागत

**प्रतिनिधी । माजलगांव**



विधानसभा निवडणूकीचे वारे वाहू लागले असुन शिवसेना(शिंदे गट)ची गळती सुरू झाले असून माजलगाव शिवसेना शिंदे गट चे उपतालुकाप्रमुख निलेश कांबळे व त्यांचे सहकारींनी एमआयएम पक्षाचे अध्यक्ष खा.असदोद्दीन आवेसी ,आ.अकबर आवेसी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा.खा.इम्तियाज जलील , बीड जिल्हाध्यक्ष अँड शफिक भाऊ यांचे हात बळकट करण्यासाठी निलेश कांबळे, कमलेश टाकणखर, इंद्रजीत टाकणखर, प्रदीप जाधव, अनिकेत तुपेसमुद्रे, आदित्य टाकणकर, आदित्य बेद्रे, राजदीप शिंदे व अन्य सहकारींनी बीड जिल्हा संपर्क कार्यालय येथे एमआयएम बीड जिल्हाध्यक्ष ड शेख शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली एमआयएम पक्षात जाहीर प्रवेश केला.प्रवेश वेळी निलेश कांबळे यांनी सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील होऊन जय भीम जय मीम घोषणा करत प्रत्येक गांव,वाडी,तंडी पर्यंत पक्षाचे विचार सामान्य नागरिकांत पोहचण्यासाठी प्रयत्न करणार आहे अशी प्रतिक्रिया दिली हयावेळी ज्येष्ठ नेते सलाम सेठ, एमआयएम जिल्हा उपाध्यक्ष शेख युसूफ, तालुकाध्यक्ष इद्रिस पाशा, शहराध्यक्ष शेख रशीद व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेठ बीड पोलीस ठाण्यात दमदार कामगिरी चोरीची मोटरसायकल पकडली

**प्रतिनिधी । बीड**




बीड शहरामध्ये मोटरसायकल चोरीचे प्रमाण जास्त प्रमाणात वाढलेले आहेत पोलीस ठाण्याचे कर्मचारी यांनी आज रंगी हात मोटरसायकल चोरास आज मोठ्या सीताफिने पकडले आहे आज रोजी खंदेश्वरी मंदीर परिसरात पेट्रोलिंग करीत असताना इसम नामे अनिल सुनिल दुधाळ वय २५ वर्षे रा मादळमोही ता गेवराई त्याचे ताब्यामध्येस्प्लेंडर विना नंबरची मोटरसायकलविचारपूस केली असताकुठे शिवाजीनगर बस स्टॅन्ड येथून दिनांक पाच दहा २४ रोजी रात्री बारा ते एक च्या दरम्यान चोरून आणण्याचे सांगत आहेसदरची खात्री केली असता पोस्ट शिवाजीनगर गु र नं५००/२०२४ कलम ३०३/ २ बीएनएसमधील मोटरसायकल व आरोपी पोस्ट शिवाजीनगर यांच्या ताब्यात देण्यात आला आहे. पोनि मोदीराज -झख सिरसाठ पोह शेख नसीर सानप कलीम इनामदार देशमुख हजारे सोनवणे कार्यवाहि करण्यात आली आहे



बीड जिल्ह्यामध्ये गेवराई तालुक्यात खामगाव येथील घडलेल्या बलात्काराच्या घटनेमध्ये पोलीस यंत्रणेने चुकीची एफ आर दाखल केलेली आहे.. मुलगी ही लमानी समाजाची आहे पण तिचं लग्न पारधी समाजाच्या मुलासोबत झाल आहे आणि तिच्यावर अत्याचार घडला आहे या प्रकरणामध्ये पूर्णपणे चुकीचं गेवराई पोलीस येतील कर्मचाऱ्यांनी एफ आर नोंदवला आहे..हे सर्व प्रकरण नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्ह्याच्या वतीने कावेरी जाधव, निसार शेख, दीक्षा मीर पगार, उमेश पारिक, आम्ही उचलून धरल्यानंतर काल रात्री हा एफ आर दाखल झाला.. दोन वृद्ध महिलांचे कुऱ्हाडीचे घाव घालून तीन हात मोडले आहेत त्यांचे ऑपरेशन रेणू हॉस्पिटल या ठिकाणी झालेला आहे. सर्व पत्रकार बांधव संपादक यांच्या माहितीस्तव. खाली दाखल केलेला एफ आर पाठवत आहे.

# निवडणुकीमुळे मुकादमाची गोची लेबर घेवून जावा का नाही मुकादम संभ्रमात

**प्रतिनिधी । तेलगांव**

बीड जिल्ह्यात निवडणुकीचा फेवर वाढला असून ऊसतोडीला जाण्याचा ही हंगाम सुरु झाला आहे मात्र अनेक मुकादम संभ्रमात आहेत. तेलगाव परिसरात मुकादमाची संख्या भरमसाठ आहे.प्रत्येक मुकादम कोणत्या ना कोणत्या पार्टीचा कार्यकर्ता आहे. त्यातच ऊसतोडीला जाण्याचा हंगाम सुरु झाला आहे. मात्र विधानसभा च्या निवडणुकीचा कार्यक्रम लागला असल्यामुळे मुकादमाची चांगलीच पंचायत झाली आहे. अनेक उमेदवार मुकादमच्या संपर्कात आहेत. आता जर ऊसतोड कामगार स्थलांतरित झाले तर त्यांना कारखान्याहून मतदाणासाठी घेवून येणे परवडणार नाही त्यासाठी त्यासाठी मतदान होई पर्यंत जाऊ नं देणे हाच एक पर्याय असल्यामुळे मुकादमला उमेदवाराकडून आर्थिक आमिष देऊन स्थलांतर रोखण्यासाठी प्रयत्न होत आहेत.त्यामुळे मुकादमाची दिवाळी त चंगळ होणार असून ऊसतोड कामगार ची मात्र पंचायत झाली आहे. बीड जिल्ह्यातील वातावरण बघितले तर जातीय व सामाजिक राजकारण खूप विकोपाला गेले आहे.त्यामुळे मुकादमकडून ऊसतोड कामगारांना काय सांगावे हेच कळेनासे झाले आहे.. काही मुकादम तर मी ज्या उमेदवाराला मतदान करायला सांगेन त्याच उमेदवाराला मतदान करायचे अशी तंबी देत असल्याची चर्चा आहे.नाही तर तुला कराखण्याला नेवून सोडतो अशा पद्धतीने दबाव टाकीत असून इच्छा नसून ही मुकादमच्या दबावापोटी मतदारावर मतदान करण्याची वेळ आली आहे त्यामुळे ऊसतोड कामगार हातबला दिसत आहे. बीड जिल्ह्यातील राजकारण हें ऊसतोड जगारांच्या भोंवती फिरत असून आउमेदवाराचे भवितव्य ऊसतोड कागरावर अवलंबून आहे.

# समर्थ कन्स्ट्रक्शनने दलित समाजाचा अंत पाहू नये

## दलित वस्ती योजनेअंतर्गत आलेल्या निधीचे अपहार करून इतर ठिकाणी काम करण्यात येत असले बाबत

**प्रतिनिधी । बीड**

लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती योजना सन २०२४-२५ अंतर्गत जो निधी रुपये ४,२०,००,०००/- (अक्षरी चार कोटी वीस लाख रुपये) चा आला आहे तो निधी दलित वस्तीत न वापरता इतरत्र वापर करुन रस्त्याचे काम चालू आहे.तरी सदरील काम हे मनोज पाठक यांचे नावे असलेल्या' समर्थ कन्स्ट्रक्शन' यांना देण्यात आलेले आहे. तरी सदरील कन्स्ट्रक्यशन चे मालक नामे मनोज पाठक यांनी स्वतःची एक ही वस्तून आणता दुसऱ्याकडून म्हणजेच दुसऱ्याला एखाद्या प्रायव्हेट माणसाला ते काम विकून त्याचे कमिशन वर पैसे घेवून काम करवून घेत आहे. वॉर्ड क्र २ (एस.सी राखीव) मोंढा रोड शिवशारदा बिल्डींग सुझुकी शोरुम ते जिजामाता चौक ते संत सावता माळी चौक ते अमरधाम स्मशानभुमी पर्यंतच्या बोगस काम करीत आहे.

तरी वॉर्ड क्र २ मधील सर्व दलित नागरीक यांची फसवणुक केली आहे आणि करीत आहे म्हणून वॉर्ड क्र २ मधील सर्व दलित बांधव आणि भगिनी मनोज पाठक यांच्या विरोधात मा. जिलहाधिकारी व मा. मुख्याधिकारी यांच्या कार्यालयावर निषेध मोर्चा काढणार आहेत आणि तेसच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व बांधकाम मंत्री यांना देखिल तक्रार करणार आहेत संबंधित चालू असलेले काम हे त्वरीत लवकरात लवकर बंद करून याची चौकशी होणे गरजेचे आहे नाही तर येत्या दोन ते तीन दिवसात वार्ड क्र २ मील आंबेडकरी जनता शांत राहणार नाही आमच्या हक्काचा निधी हा इतरत्र जाऊ देणार नाहीत यासाठी आमचा जिव गेला तरी आम्ही दलितबांधव आणि भगिनी मागे हटणार नाहीत.तरी मनोज पाठक यांच्या नावे असलेल्या समर्थ कन्स्ट्रक्शन ला काळया यादीत नाव टाकून दलित बांधवांना न्याय मिळावा यासाठी



आम्ही सर्व जण मिळवून एक लढा उभारणारच आहोत.असे शुभम गणेश प्रधान सामाजिक कार्यकर्ता व भिमसैनिक यांनी म्हटले आहे.

# केज मतदार संघातून पुन्हा नमिताताई मुंदडानाच गुलाल लावणार कार्यकर्ते बैठकीमध्ये संकल्प

**प्रतिनिधी । केज**



या बैठकीला केज विधानसभा मतदार संघातील जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, जोगाईवाडीचे सरपंच बालासाहेब दोडतल्ले, जेष्ठ नेते शेख रहिमभाई, नगरसेवक शेख ताहेर, कल्याण काळे, तसेच माजी नगरसेवक अनंतदादा लोमटे, मोरेवाडीचे सरपंच औदुंबर मोरे, नगरसेवक अतुल देशपांडे, संतोष शिनगारे, होळचे नेताजी शिंदे, जि.प. सदस्य विजयकांत मुंडे, भगवान सेनेचे मुरलीधर ढाकणे, सुनिल घोळवे, राहुल गदळे, महादेव सुर्यवंशी, राजाभाउ मुंडे, जि.प.सदस्य राणा डोईफोडे, पत्रकार प्रकाश मुंडे, भारत काळे, नगरसेवक संजय गंभीरे, भाजप नेते हिंदुलाल काकडे, भाजपचे केज तालुकाध्यक्ष भगवान केदार, डॉक्टर सेलचेजिल्हाध्यक्ष डॉ. वसुदेव नेहरकर, जेष्ठ नेते सुनिल आबा गलांडे, बाजार समितीचे माजी सभापती मधुकर काचगुंडे, विकास जाधव, दत्ता सावंत, संतोष जाधव, जाधवर सरपंच, सुरेश नांदे, खद्दीर खुरेशी, प्रशांत अदनाक यांच्यासह इतर मान्यवर नेते उपस्थित होते. पुढील आठवड्यात आ. नमिताताई मुंदडा यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला जाणार आहे. महायुतीकडून अद्याप उमेदवारी जाहिर झालेली नसली तरी एक दोन दिवसात उमेदवारी जाहिर होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तारीख कळविणार असल्याचे सांगण्यात आले.

# मुख्याधिकारी कोमात; मोकाट कुत्रे जोमात

**प्रतिनिधी । बीड**

तीन वर्षाच्या चिमुकलीचे मोकाट कुत्र्यांनी तोडले लचके. त्वरित कुत्र्यांचा बंदोबस्त करा नसता आंदोलन करण्यात येईल. नितीन सोनवणे.चिऊ डोंगरे वय ३ वर्षे प्रकाश आंबेडकर नगर ईमामपुर रोड बीड ही चिमुकली घरासमोर खेळत असताना पिसाळलेल्या कुत्र्यानं अनेक जागी चावा घेतलेला आहे.

बीड शहरात मोकाट कुत्रे व जणावरे यांचा बंदोबस्त करा. अन्यथा ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने लोकशाही मार्गानें रस्तावरील मोकाट कुत्रे घेऊन मुख्याधिकारी यांच्या कॅबीन मध्ये सोडन्यात येईल. मंगच मुख्याधिकारी यांना कळेल. की सर्व समान्य जनतेला मोकाट कुत्र्यांचा काय त्रास सहन करावा लागतो. ज्या वेळेस मोकाट कुत्रे संबंधित अधिकार्यांचे लचके तोडत नाहीत तो पर्यंत या भ्रष्ट अधिकार्यांना जाग येणार नाही. आज पर्यंत शहरां मध्ये शेकडो लहान मुला पासुन तर व्रध महीलांचे या मोकाट कुत्र्यांनी लचके तोडले



त्या नंतर आज पर्यंत शेकडो तक्रारी मुख्याधिकारी यांच्या कडे केलेलें असुन परंतु मुख्याअधिकारींनी त्या तक्रारीला जाणीव पुर्वक केराची टोपली दाखली..

# आ. प्रकाश दादा सोळंके व जयसिंग भैय्या सोळंके हे कायम ओबीसींच्या पाठीशी - ॲड. आनंद काळे

## बदनामी करणाऱ्यांची आता गय करणार नाही – ॲड आनद काळे

**प्रतिनिधी । बीड**

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके व युवकांचे हृदयस्थान जयसिंग भैय्या सोळंके हे कायम ओबीसीच्या हितासाठी तत्पर राहिले आहेत. आ प्रकाश दादा सोळंके आणि जयसिंग भैय्या सोळंके यांची जाणीवपूर्वक बदनामी करण्याचे षडयंत्र काहीजण रचत असून अशा षडयंत्राला समाजबांधवांनी बळी पडू नये. आमदार प्रकाश सोळंके व जयसिंग सोळंके हे सदैव ओबीसी समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहात असल्याचे मत ॲड. आनंद काळे यांनी व्यक्त केले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावागावात अनेक जण संवाद दौरे काढत आहेत. या जन संवाद दौऱ्याच्या निमित्ताने अनेक इच्छुक आपल्या हितासाठी वेगवेगळ्या चाली खेळत असून या गाव भेटी दौऱ्याच्या निमित्ताने आमचे नेते आमदार प्रकाश दादा सोळंके व समस्त युवकांचे हृदय स्थान जयसिंग भैय्या सोळंके यांची बदनामी करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू केले जात आहे. प्रत्यक्षात मी ओबीसी समाजातील आहे. आजवर ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी आपण तालुका स्तरावर व गावागावात सर्व समाजाला एकत्र करून लढा उभारला आहे. या ओबीसी समाजाच्या हितासाठी आ प्रकाश सोळंके व जयसिंग भैय्या सोळंके यांनी सहभाग घेऊन खंबीर साथ दिली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना अद्याप पर्यंत त्यांनी कधीही दुजाभाव केलेला नाही. प्रत्येक वेळी महत्त्वाच्या चर्चे दरम्यान माझ्यासारख्या ओबीसी कार्यकर्त्याला प्राधान्य देऊन त्यांनी सदैव विविध विकासात्मक निर्णयात महत्त्वाचे स्थान दिले आहे. मात्र आमच्यातीलच काही दुष्ट प्रवृत्तीचे

लोक आमदार प्रकाश दादा सोळंके असे रोखठोक व जयसिंग भैया सोळंके यांना मत ॲड. आनंद बदनाम करण्यासाठी पुढे सरसावले काळे यांनी आहेत. आपण माजलगाव व्यक्त केले विधानसभा मतदारसंघातील



ओबीसी समाज बांधवांना नम्रपणे आव्हान करतो की कोणीही अशा भुलथापांना बळी पडू नये. प्रकाश दादा सोळंके हे सर्वसामावेशक नेतृत्व आहेत. जयसिंग भैय्या सोळंके देखील तमाम युवकांचे हृदय स्थान आहेत. या दोघांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये कधीही जातिवाद केला नाही. त्यांना सर्व समाज बांधवांच्या विषयी आदर असल्याचे आपण सर्वांनी पाहिले असून यापुढे मात्र त्यांची बदनामी करणाऱ्यांची गय केली जाणार नाही

### सौ.के.एस.के.महाविद्यालयात बालरंगभूमी परिषदेच्या वतीने आयोजित

# आकाश कंदील बनविणे कार्यशाळा संपन्न

बीड(प्रतिनिधी)

बालरंगभूमी परिषद शाखा बीड व सौ.के.एस.के.महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनानुसार आकाश कंदील बनविण्याची एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये बीड शहर व परिसरातील एकूण १६ शाळांच्या विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला होता. या कार्यशाळेच्या प्रशिक्षणासाठी कैलास कला निकेतन बीड येथील तज्ञ ११ प्रशिक्षकांनी सहभागी ८० विद्यार्थ्यांना व सौ.के.एस.के.महाविद्यालयातील कमवा व शिका योजनेचे ३३ विद्यार्थी असे एकूण ११३ सहभागी विद्यार्थ्यांना आकाश कंदील बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. इको फ्रेंडली आकाश कंदील बनविण्याचे तंत्र व कसब या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शिकविण्यात आले.या कार्यक्रमाच्या वेळी बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर म्हणाल्या की, बालवयामध्ये विद्यार्थ्यांच्या अंगी कला कौशल्य विकसीत होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून बालरंगभूमी परिषद सातत्याने विद्यार्थ्यांना जीवनात उपयोगी होतील असे उपक्रम राबवत आहे. आणि या उपक्रमांसाठी शाळेतील विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होतो.



वेगवेगळ्या आकाराचे व उत्कृष्ट रंगसंगतीचे आकाश कंदील विद्यार्थ्यांनी या वेळी तयार केले. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना बालरंगभूमीच्या वतीने आवश्यक ती सामग्री देण्यात आली होती. सहभागी विद्यार्थ्यांनी अत्यंत कलात्मक पध्दतीने आकर्षक आकाश कंदीलांची निर्मिती केली. या कार्यशाळेसाठी प्रशिक्षक म्हणून अजय कांबळे,गोविंद राठोड,शरद गाढवे,संकेत पवार, नानाभाऊ मसवले, अजय पवार, करण राठोड,श्रध्दा देवडकर,प्रियानी गोरे,नम्रता बारस्कर, कृष्णा शेवंतकर आदी होते.या कार्यशाळेसाठी उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर,पदव्युत्तर संचालक डॉ.खान ए.एस. यांची उपस्थिती होती. तर प्राध्यापक दीपक जमधाडे, प्रा.सुरेश थोरात,प्रा.इंद्रजीत भांगे, डॉ.राजकुमार राख यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणा दरम्याने सहकार्य केले.प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेले आकर्षक आकाश कंदील यांचे सादरीकरण करण्यात आले.

# ओबीसी-मराठ्यांची एकजूट समाजभेद्यांचा पराभव करणार !

## 'आयएसी'चे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांचे भाकित

मुंबई (प्रतिनिधी)

राज्यात विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी सर्वच राजकीय पक्षांनी सुरू केली आहे. काही राजकीय पक्षाचे नेते गुडघ्याला बाशिंग बांधून सत्तेत येण्याची स्वप्न रंगवत आहेत. परंतु, केवळ राजकारणासाठी ओबीसी आणि मराठा समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्या समाजभेद्यांना या निवडणुकीत मतदार राजा धोबीपछाड देईल, असे भाकित इंडिया अगेन्स्ट करप्शनचे (आयएसी) राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी शनिवारी (ता.१९) वर्तवले. गेल्या काही काळामध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आरक्षणाच्या मुद्द्यावरून सामाजिक तेढ निर्माण करण्यात आली. ओबीसी विरूद्ध मराठा असा संघर्ष पेटवण्यात आला. परंतु, आता पुरोगामी महाराष्ट्रात समाजासमाजात दरी निर्माण करणार्यांना जनताच घरचा रस्ता दाखवेल, असा विश्वास हेमंत पाटील यांनी व्यक्त केला.

ओबीसी-मराठा बांधवांच्या प्रश्नांना योग्य न्याय देण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी उमेदवारी देतांना प्रामुख्याने ओबीसी-मराठा समाजाच्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार केला, तर राजकीय प्रतिनिधित्वाचा समतोल साधला जाईल. या समाजाच्या लोकसंख्येच्या आधारे त्यांना उमेदवारी द्यावी, असे आवाहन देखील त्यांनी यानिमित्ताने केले.

मनोज जरांगे पाटील रविवारी त्यांची राजकीय भूमिका स्पष्ट करतील. परंतु, ओबीसी-मराठा समन्वय समिती जरांगेच्या भूमिकेनूसार पुढील राजकीय निर्णय घेईल. किमान २५ ओबीसी उमेदवार



देण्याची मागणी असून याअनुषंगाने जरांगे यांच्या सोबत बोलणी सुरू असल्याचे पाटील म्हणाले. जरांगेनी निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला तर आठवड्याभरात मतदार संघानिहाय उमेदवारांची यादी जाहिर होण्याची शक्यता देखील पाटील यांनी व्यक्त केली.

# संस्कार शाळेच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटीच्या माध्यमातून श्रीरत्नेश्वर मंदिर व निसर्गरम्य परिसरास दिली भेट

परळी ।प्रतिनिधी

शहरातील पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा पद्मावती व विद्यानगर विभागातील इयत्ता पहिली ते तिसरी च्या विद्यार्थ्यांनी टोकवाडी येथील श्री रत्नेश्वर मंदिर व निसर्गरम्य परिसरास क्षेत्र भेट दिली. यावेळी या क्षेत्रभेटीत इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या चिमुकल्यांनी परळी तालुक्यातील टोकवाडी येथील रत्नेश्वर मंदिर व निसर्गरम्य परिसरात क्षेत्रभेट दिली. उंच डोंगर माळावरील निसर्गरम्य परिसर पाहून विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी वनभोजनाचा आस्वाद घेतला व धमाल केली.

आपण पाहत आहोत की आपल्या आजूबाजूचा निसर्ग, त्यातील जैवविविधता याच्याशी नाळ तुटत आहे. इमारतींच्या जंजाळामध्ये झाडांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे स्वाभाविकच शहरांमध्ये पूर्वीच्या प्रमाणात पक्षी आढळत नाहीत. पूर्वी खिडकीतून दिसणारे हे पक्षी न दिसल्याने मुलांना निसर्गाची पहिली ओळख विलंबाने होते. त्याचप्रमाणे मोबाइल, वाय-फाय, संगणक व इतर गॅजेट्स यामध्ये त्यांना अधिक रस निर्माण होतो. या गोष्टींशिवाय राहणे अशक्य असल्याचे त्यांना वाटते. झाडांकडून मिळणारा ऑक्सिजन, पाण्याची गरज, निसर्गचक्रातील किटकांपासून माणसापर्यंत प्रत्येक प्राण्याच्या अस्तित्वाचे महत्त्व त्यांना समजत नाही. निसर्ग आपल्या आयुष्यात काय भूमिका



विद्यार्थ्यांनी घेतला वनभोजनाचा आनंद

बजावतो ते लक्षात न येणे धोकादायक आहे.मुलांना निसर्गाची ओळख करून देणे व गॅजेटपासून सुटका करून घेणे आणि निसर्गाची गरज समजावणे या दोन्ही दृष्टिकोनातून भविष्यासाठी महत्त्वाचे आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात क्षेत्रभेटीचा अनन्यसाधारण महत्त्व आहे क्षेत्रभेटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची चिकित्सा, बुद्धी, ज्ञान, आकलन, व्यक्तिमत्व विकास व अवतीभोवतीचे जग व अवतीभोवतीचा निसर्ग परिसर असे एक ना अनेक माहिती मिळते व त्याचे शैक्षणिक जीवनात फायदा होतो ही बाब नजरेसमोर ठेवून संस्थेचे अध्यक्ष श्री कैलास तांदळे तसेच सचिव श्री दीपक तांदळे यांच्या संकल्पनेतून परळी परिसरातील टोकवाडी येथील रत्नेश्वर मंदिर व निसर्गरम्य परिसरास क्षेत्रभेट देण्यात आली. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होते.

# वाहनात बेकायदा घरगुती गॅस भरतांना तिघे अटकेत



शहर पोलिसांची कारवाई

माजलगाव-(प्रतिनिधी)

शहरातील बायपास रोडलगत असलेल्या मुंबाजा मोटार गॅरेज नावाच्या दुकानावर शनिवारी दुपारी शहर पोलीसांनी छापा टाकुन तेथे घरगुती वापरासाठी उपलब्ध असलेला भारगतगैस गॅस (स्फोटक पदार्थ) धोकादायकरीत्या लोकांचे जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहनामध्ये निष्काळजीपणे भरत असतांना तीन लोकांना ताब्यात घेतले.

शहर पोलीसांच्या फिरत्या पथकास गुप्त खबर मिळाल्यावरुन पथकाने शनिवारी दुपारी बायपास रोडवरील मुंजाबा गॅरेज येथे धाड टाकली असता.तेथे तीन इसम घरगुती गॅस वाहनात धोकादायक पद्तीने भरतांना आढळुन आले.त्यांचे ताब्यातील एक ओमीनी वाहन, ०६ भारतगैस कंपनीचे गॅस सिलींडर, गॅस भरण्यासाठी वापरात येणाऱ्या दोन इलेक्ट्रीक मोटार असा एकुण १,७४,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एकुण ०५ आरोपीतांविरुध्द गु.र.नं. ४१८/२०२४ कलम २८७,२८८ भारतीय न्याय संहीता सन २०२३ सह कलम ३/७ अत्यावश्यक वस्तु अधिनियम सन १९५५ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. सदरची कारवाई पी.आय.राहुल सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एस.आय माकणे , जमादार तोटेवाड ,पो.काँ.पवार,थापाडे,हे.काँ गायकवाड आदीने केली

# उद्धव ठाकरे यांना सन्मानाने मुख्यमंत्री करण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज रहावे - रत्नाकरअप्पा शिंदे

## गद्दारांना धडा शिकविण्यासाठी हिच खरी वेळ-भोजराज पालीवाल

परळी ।प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांना पुन्हा सन्मानाने मुख्यमंत्री करण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज रहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख रत्नाकरअप्पा शिंदे यांनी केले. तर शिवसैनिकांच्या साथीने महाराष्ट्रात भगवा फडकवून गद्दारांना धडा शिकविण्यासाठी हिच खरी वेळ असल्याचे मत तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल यांनी केले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षा वतीने आज शनिवार, दि.१९ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता शिवसेना तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल यांच्या भवानीनगर येथील संपर्क कार्यालय येथे झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी



महाराज, हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या प्रतिमेचे पुजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री मा.उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना नेते तथा माजी मंत्री आदित्यजी ठाकरे यांच्या आदेशावरून, शिवसेना मराठवाडा संपर्कप्रमुख सुनिलजी प्रभू, मराठवाडा समन्वयक नेरूरकर साहेब, शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे, बीड जिल्हा संपर्क प्रमुख परशुराम जाधव, बीड लोकसभा प्रमुख माजी आ.प्रा.सुनीलदादा धांडे, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी पुढे बोलताना रत्नाकर शिंदे म्हणाले की, मा.उद्धव साहेबांनी माझ्यावर जबाबदारी दिल्यानंतर मी थांबणार नाही मी सतत पक्ष वाढीसाठी प्रयत्न करणार असुन संघटक मजबुत करण्यासाठी सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घ्यावे असे आवाहन केले. तर शिवसैनिकांच्या साथीने महाराष्ट्रात भगवा फडकवून गद्दारांना धडा शिकविण्यासाठी हिच खरी वेळ असल्याचे मत तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल यांनी केले. (उर्वरीत पान २ वर)

# परळी मतदारसंघात शेतकऱ्यांच्या उदंड प्रतिसादानंतर यशस्वी सांगता

## ना शेतकरी, ना युवक, ना सर्वसामान्य जनतेच्या सर्वांगीन विकासात्मक पातळीवर कृषिमंत्री ठरले फेल- सुनील गुट्टे

परळी / प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शेतकरी संवाद यात्रा काढण्यात आली. राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकत्व असलेल्या नेतृत्वा कडुन मतदार संघात कुठेही ना शेतकरी, ना युवक, ना सर्वसामान्य जनतेच्या सर्वांगीन विकासात्मक पातळीवर विकास दिसून आला नाही. मला पाहा आणि फुले व्हा असणाऱ्या मंत्र्याला यावेळी परळी मतदार संघातील जनता पराभूत केल्या शिवाय राहणार नाही असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते श्री. सुनील गुट्टे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जेष्ठ नेत्या सौ.सुदामती गुट्टे व शेतकरी नेते कालिदास आपेट यांच्या मार्गदर्शनाखाली, युवानेते सुनील गुट्टे यांच्या नेतृत्वात परळी मतदारसंघातील शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिकांचा सुसंवाद करण्यासाठी शेतकरी संवाद यात्रेचे मतदारसंघात दोन टप्प्यात आयोजन करण्यात आले होते.या शेतकरी संवाद यात्रे दरम्यान पहिल्या टप्प्यामध्ये ९ दिवस, ८८ गावं, ४२३ किलोमीटर प्रवास तर दुसरा टप्पा ६ दिवस, ६८ गाव, ३७० किलोमीटर चा प्रवास पूर्ण करून या संवाद यात्रेने हजारो नागरिकांशी थेट संवाद साधला गेला. शेतकऱ्यांच्या हक्काचा पिकविमा शेतकऱ्यांना अजूनही भेटला नाही, अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान भेटले नाही. राज्य सरकारने व कृषीमंत्र्यांनी शेतकऱ्यांना कुठलाही आधार दिला नाही २५ टक्के अग्रीमची घोषणा करून आजतागायत दोन महिने उलटुन गेले. यामुळे शेतकऱ्यांमध्ये खूप मोठा रोष दिसून येतो आहे. मतदारसंघात बहुतांश रस्त्याची खूप मोठी दुर्वास्था दिसून येत आली. कुठल्याही गावाला पांदण रस्ते, शेत रस्ते झालेले नाहीत दळणवळण आणि विकासाच्या दृष्टीने ज्या काही गोष्टी करणं गरजेचं होत अपेक्षित होत असं कुठलंही काम परळी मतदारसंघातील जनतेला दिसत नाही. कृषिमंत्र्यांनी पाच वर्षांमध्ये किमान पाच गावांना पाच वेळा सुद्धा भेटी दिलेल्या नाहीत. शासनाच्या अनेक योजना ह्या सर्वसामान्य लोकांना मिळालेले नाहीत. ज्या लोकांचे मजबूत घर आहेत अश्याच लोकांना घरकुलचा लाभ देण्यात आला आहे. सर्वसामान्य गरजवंत लोकांना ही योजना नाही प्रत्येक गावामध्ये एक ते दोन पुढारी नेमलेले आहेत त्या गावांमध्ये त्या योजनेचा लाभ कोणाला द्यायचा तेथे पुढारी ठरवतात यामुळे त्यांच्या फक्त कार्यकर्ते आणि गाव पुढारी यांनाच योजना व ज्या सुख-सुविधाचा लाभ मिळतो बाकी सर्व सामान्य लोकांना कुठलीही योजना परळी मतदारसंघात मागच्या पाच वर्षात मिळालेल्या नाहीत. कृषिमंत्र्यांनी फाईव्हस्टार एमआयडीसीच्या फक्त अनेक वेळा घोषणा व बातम्या लावल्या चर्चा केल्या पण प्रत्यक्षात कुठलंही काम केलेले दिसून येत नाही. वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या अनेक अडचणी मागच्या सहा-सात वर्षापासून हा कारखाना बंद झाल्याने निर्माण झाल्या आहेत. पाच वर्षात दोन सरकार मध्ये दोनदा मंत्रीपद मिळाल्यानंतर तरी प्रगती होणे अपेक्षित असताना दोन चे चार कारखाने होणे गरजेचे असताना आहे ते कारखाने बंद पाडला गेला आहे. शेतकरी, ऊस वाहतूकदार व कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचे करोडो रुपये थकीत आहेत हे संपूर्ण नागरिक यावर नाखुष दिसून येतात यावर कोणीही बोलायला तयार नाही.सगळा युवक बेरोजगारीने त्रस्त झाला आहे. जि.प. च्या शाळा डिजिटल करणार अशी घोषणा सरकार करते परंतु मतदारसंघात एकही शाळा डिजिटल दिसली नाही. व्यापाऱ्यांच्या पुर्ण एजन्सी काढून घेत जात असल्याने व्यापारी त्रस्त आहे. दहशत, गुंडगिरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असुन जो कोणी आवाज उठवेल त्याच्या विरुद्ध खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण भयानक असुन परळी मतदारसंघातील मागच्या पाच वर्षांमध्ये हजारो लोकांचे पुणे मुंबई या ठिकाणी कामासाठी स्थलांतरित झाले आहेत यालाही पालकमंत्री च जवाबदार आहेत. बारामतीच्या धरतीवरून विकास करणार मतदारसंघातील प्रत्येकाचे उत्पन्न दुप्पट करणार, उद्योग निर्माण करणार अशा अनेक वेळा वलघणा पालकमंत्र्यांनी वेळोवळी भाषणात केल्या यासाठी करोडोचा निधी मतदारसंघात आला परंतु केवळ कागदावर दिसतो पण प्रत्यक्षात तो विकास कुठेही दिसत नाही. कागदावर च कामे दाखवून बिले उचलली जात आहेत. यामुळे कृषीमंत्र्याच्या मोठ्या मोठ्या भाषणाला आणि आश्वासनाला परळी मतदार संघातील जनता पूर्णपणे वैतागली असुन ना शेतकरी, ना युवक, ना सर्वसामान्य जनतेच्या सर्वांगीन विकासात्मक पातळीवर कृषिमंत्री धनंजय मुंडे हे फेल ठरल्याचे दिसून आले असलेल्याचे हजारो नागरिकांच्या संवादातून दिसून आले असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे युवानेते सुनील गुट्टे यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

शेतकरी संवाद यात्रेच्या मार्गदर्शिका सौ. सुदामती गुट्टे व शेतकरी नेते कालिदास आपेट यांच्या नेतृत्वाखाली यात्रा संपन्न झाली असुन युवानेते सुनील गुट्टे, तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, विधानसभा अध्यक्ष किरण पवार, शेतकरी संघटना प्रदेश कार्याध्यक्ष कालिदास आपेट, तालुका सचिव ईश्वर सोनवणे, तालुका कार्याध्यक्ष रमेश ढाकणे, उपाध्यक्ष महारुद्र कदम, शहराध्यक्ष ड. जीवनराव देशमुख, युवक शहराध्यक्ष सय्यद फिरोज, दत्ताभाऊ शिंदे, जगन्नाथ काकडे, कैलास लाकडे, मारुती भद्रे, जगमित्र पोळ, व्यंकटेश निर्मळ, दिनेश तपसे, धनंजय जाधव, मुक्तार भाई, शिवाजीराव लोमटे, बब्रुवान आघाव, आदिनाथ कदम, मदनराव वानखेडे, रुस्तुम माने, विशाल माने, ऋषिकेश शिंदे, सुदर्शन शिंदे, बाळासाहेब रुपनर, सर्जेराव गडदे, नागनाथ शिंदे, विजयराव भोसले, हनुमंतराव सोळंके, श्रीकृष्ण जाधव, अंगदराव वाकडे, राजकमल देशमुख, अमोल बावणे, उद्धवराव आघाव, सोमनाथराव भोसले, वृक्षराज काळे, राजेभाऊ काळे, बंडू काळे, गोपाळराव शिंगाडे, छत्रगुण नाना लांडगे, बळीराम गुट्टे, बाबासाहेब गव्हाणे, नंदू दोडके, नितीन हारे, प्रणित अटुळे यांसह शेतकरी संवाद यात्रा यशस्वी करण्यासाठी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.



### परळी शहरात महिलांसाठी स्वच्छ शौचालय दाखवा आणि पाच हजार बक्षीस मिळवा- सौ.सुदामतीताई गुट्टे

परळी शहर हे प्रभु वैद्यनाथाची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्य परराज्यातील मोठ्या प्रमाणात महिला भाविक भक्त येत असतात. शिवाय परळी तालुक्यातील महिला, नागरिक बाजार करण्यासाठी परळी शहरात येतात तेव्हा त्यांना कुठे शौच्चालय दिसून येत नाहीत. असले तरी ते प्रचंड घाण, दुर्गंधी असलेले शौच्चालय आहेत या नैसर्गिक विधी साठी महिलांना प्रचंड मानसिक त्रास होतो आहे यामुळेच मी परळी शहरात महिलांसाठी स्वच्छ शौचालय दाखवा आणि पाच हजार बक्षीस मिळवा अशी घोषणा केली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT